बुद्धाब्दः २५६८. आसाळ्हमासो-सावनमासो

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स

RNI क्रमांक - MHMUL/25/A1620

28 JULY 2025 सोमवार

संपूर्ण महाराष्ट्रातून वितरित





# त्रिपिटक वार्ता

परिवर्तनाचं पहिलं पाऊल"

"परिवत्तनस्स पठमो पादो "

वर्ष 1 ले, अंक 2

पृष्ठे 4 , मूल्य 10

साप्ताहिक

"पालि भाषेचे पुनरुज्जीवन आणि धम्म प्रचार प्रसारासाठी समर्पित" |

क्रोधावर विजय
क्रोधाने जळते अंतःकरण,
शांततेत सापडते खरे धन।
रागाने नाती होतात विरून,
प्रेमाने जीवन फुलते हसून॥

अनुक्रमणिका

२ संपादकीय
२. कथा, शिलालेख
३. मुख्य लेख
३."पालि शिकूया बाबासाहेबांसोबत!"
४. बातम्या
४. वाचकांच्या प्रतिक्रिया

## बुद्धांचा एक सुंदर सुविचार

"क्रोध म्हणजे दुसऱ्याला फेकलेलं अंगारं — पण आधी स्वतःच जळतोस."

"बुद्धत्व दूर नाही, जो जागृत आहे तोच बुद्ध आहे."
"ज्ञान हा प्रकाश आहे, अज्ञान हे अंधार."



## “त्रिपिटक वार्ता” साप्ताहिकाचे भव्य उद्घाटन मा. डॉ. भीमराव आंबेडकर साहेबांच्या हस्ते संपन्न!

📍 मुंबई | दादर – दिनांक : २१ जुलै २०२५

बौद्ध शिक्षण, संशोधन आणि समाज परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकत “त्रिपिटक वार्ता” या साप्ताहिकाच्या प्रकाशनाचा भव्य उद्घाटन सोहळा सोमवारी, २१ जुलै २०२५ रोजी बुद्धभूषण प्रिंटिंग प्रेस, आंबेडकर भवन, दादर (पूर्व), मुंबई येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे प्रमुख उद्घाटक म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉ. भीमराव आंबेडकर साहेब हे लाभले. त्यांनी आपल्या प्रेरणादायी मार्गदर्शनातून त्रिपिटक वार्तेच्या माध्यमातून बौद्ध विचारांचे आधुनिक पुनरुज्जीवन कसे घडवता येईल यावर विचार मांडले. 🪔 “धम्माच्या प्रकाशात समाज परिवर्तन शक्य आहे. त्रिपिटक वार्ता ही बौद्ध समाजाची बौद्धिक चळवळ ठरेल,” असे मत मा.आंबेडकर साहेब यांनी यावेळी व्यक्त केले.

🎙 या कार्यक्रमात त्रिपिटक वार्ता साप्ताहिकाच्या संपादकीय मंडळातील मान्यवर सदस्य उपस्थित होते. तसेच Zoom आणि YouTube द्वारे कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण करण्यात आले होते, ज्यामध्ये देशभरातून आणि परदेशातून बौद्ध अनुयायी सहभागी झाले. 🎉 साप्ताहिक “त्रिपिटक वार्ता” हे माध्यम बौद्ध शिक्षण, संशोधन, सांस्कृतिक जतन आणि सामाजिक चळवळीला चालना देणारे प्रभावी धम्मपीठ ठरणार आहे. 📌 कार्यक्रमाची सांगता “धम्माची ज्योत तेवत ठेवूया, परिवर्तनाचा दीप पेटवत राहूया” या घोषवाक्याने करण्यात आली.



📍 चैत्यभूमी येथे बौद्धाचार्य धम्म प्रशिक्षण शिबीर संपन्न

🔹 "पुण्यानुमोदन गाथा व विधी" या विषयावर प्रात्यक्षिक मार्गदर्शन

मुंबई | प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने दिनांक १९ जुलै २०२५ रोजी दादर (पश्चिम), मुंबई येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, चैत्यभूमी येथे एक विशेष "बौद्धाचार्य धम्म प्रशिक्षण शिबीर" आयोजित करण्यात आले. या शिबिराला विविध भागांतील धम्मप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिराची सुरुवात पूजनीय भंते श्रद्धापालजी यांच्या मार्गदर्शनाखाली पारंपरिक त्रिशरण पंचशील वंदना घेऊन झाली. सर्व शिबिरार्थींनी श्रद्धेने वंदना सादर करून धम्मभावना व्यक्त केली.

यावेळी "पुण्यानुमोदन गाथा: अर्थ व पुण्यानुमोदन विधी – प्रात्यक्षिक" या विषयावर आदरणीय आयुनी. स्वातीताई गायकवाड (महाराष्ट्र प्रदेश महिला संस्कार उपाध्यक्ष) यांनी प्रभावी व सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. त्यांनी पुण्य संकल्पना, गाथेचा अर्थ, आणि विधीचे प्रात्यक्षिक स्पष्ट करून सांगितले. त्यांचे प्रवचन श्रोत्यांच्या मनाला भावले.

या प्रशिक्षण शिबिरातून उपस्थितांना बौद्ध संस्कृतीतील पुण्यानुमोदन विधीची शास्त्रीय व आध्यात्मिक मांडणी समजून घेता आली. विशेष म्हणजे, शिबिराच्या अखेरीस सहभागी सदस्यांनी सम्यक दृष्टिकोनातून आत्मपरीक्षण करत धम्मानुशासन स्वीकारले.




पुणे जिल्ह्यातील अपरिचित येलघोल बुद्ध लेणी.

पुणा जिल्हाचा मावळ तालुक्यातील येलघोल गावाचा जवळ डोंगर, कपारीत आणि हिरवीगार झाडा, झुडपा आड लपून, दडून राहिलेला आपला इतिहासिक वारसा. भारतात १२०० चा आसपास लेण्या सापडतात. त्यातिल बहुतांश महाराष्ट्रात १००० चा आसपास लेण्या सापडतात. त्यातलीच एक अपरिचित लेणी जी लपून, दडून राहीलीली आणि आता जन माणसात माहीत पडणारी लेणी आहे. येलघोल हे एक छोट गाव आहे. सहयाद्रीचा डोंगराच्या निर्सगाचा नैसर्गिक सौंदर्याचा कुशीत वसलेले आहे.

**लेखकी : राकेश सदानंद पवार - 9867355724**
**लेणी संवर्धक / अभ्यासक - मुंबई (अंधेरी )**
**एकजूट लेणी अभ्यास प्रचार समहु महाराष्ट्र राज्य - लेणीसंवाद.**
**संदर्भ : डोंगर दरीतला फ्रिरस्ती.**



हे नाव कुणाला माहीत नाही. पण एका प्राचिन इतिहासिक ठेव्या मुळे डोंगर दरीतला फ्रिरस्ती , भटकंती करणारे आणि लेणी संवर्धक, अभ्यासक यांचा मुळे उजेडात येत आहे. येलघोल लेणी हजार वर्षा पूर्वी सुंदर अशी बौद्ध लेणी निर्माण होता होता, अर्धवट स्थितित राहिलेली दिसते. हि हिनयान लेणी आहे. येलघोल हे निर्सर्ग सौंदर्याने नटलेल्या जागी वसलेले आहे.आपण विचार करू शकत नाही अशा, सुंदर जागी येलघोल गावापासून साधारण 1 कि.मी. चा आसपास, डोंगरात ही इतिहासिक लेणी, डोंगराच्या कुशीत लपलेली, दडलेली आहे. . ह्या लेणी जवळ १० की.मि वर बेडसे बुद्ध लेणी, २३ की.मि. भाजे बुद्ध लेणी आणि २८ की.मि वर कार्ले बुद्ध लेणी आहे.

व्यापारी मार्गांवर ह्या लेण्या आहेत. ह्यावरून असे दिसते, बौद्ध धम्म संस्कृतीचा किती प्रभाव होता. बोलतात जेवढे सुंदर तेवढे कष्टकारक, म्हणजेच आपण बोलतो, सुंदर गुलाब असते पण त्याला काटे असतात, त्याच प्रमाणे या सुंदर इतिहासिक निर्सग संपन्न लेणीला भेट देण्यासाठी, पाहण्यासाठी मात्र कष्ट घ्यावे लागतात. गुलाबाचे काटे टोचून घ्यावे लागतात. लघोलला जाण्यासाठी पहिला कामशेत हया ठिकाणी याव. त्या नंतर कामशेतवरून बेडसेमार्गे तिकोनापेठ, काळे कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्याला लागावं. साधारण पणे १० कि.मी. चा आसपास कडधे नावाचं गाव लागत. त्या गावातिल मुख्य चौकातून डाविकडे वलाव, हा रस्ता सरळ सोमटणे फाट्यावर जातो. तिथून पुढे गेल्यावर साधारण पणे 3 कि.मी. चा आसपास, पुढे गेल्यावर आर्डव नावाचं गाव लागत. तिथून पुढे उजव वळण घेऊन गेल्यावर, साधारणपणे ६ ते ७ कि.मी. चा आसपास, येलघोल निसर्ग संपन्न गावात पोहचतो. तिथे एक विठ्ठल रुकमणी मंदिर आहे. तिथेच पुढे काही अंतरावर हे येलघोल गाव निर्सगाने नटलेले आहे. ते गावात आल्यावर समजते. गावात आल्यावर तिथे एक मारुति मंदिर आहे. तिथेच आसपास गाडी पार्क करावी लागते. त्या परिसरातच ७-८ समाध्याचे अवशेष ( विरगळ ) पाहण्यास मिळतात, त्याच ठिकाणी आसपास गाडी पार्क करावी लागते. तिथून पूढे पायी प्रवास हा करावा लागतो. या येलघोल गावातल्या मंदिरापासून येलघोल बौद्ध लेणीवर जाण्यास जी वाट (रस्ता) आहे, तो साधारण पणे काही अंतरावर सिमेंट चा आहे. त्याचा पुढे कच्चा रस्ता आहे. तो माती, दगड, हयांचा पाय वाटेने या लेणीपर्यंत घेऊन जातो. तसेच या लेणींवर गावात विचारले तर तिला गडदची गुफा म्हणून गावातल्या लोकांचा परिचयाची आहे. तिला गडदचे स्थान म्हणून ओळखले जाते. तसेच छिन्नीने गुहेमध्ये बदल करून मानवनिर्मित लेणी बनवन्यात आली आहे. त्यांची चिन्ह खुना आपल्याला दिसतात पहायला मिळतात. उजव्या स्तूपाचा बरोबर, डाव्या बाजूला लागून पानपोढी पाणि साठवण्यासाठी बनवलेली दिसतें. बहुतेक पावसाळा सोडून इतर ऋतू मध्ये पाणी ठेवण्यासाठी वापर होत असेल, तसेच तिला लागूनच लांब असा दगडी बाक बनवला गेला आह. साधारण २० ते २५ चा आसपास माणसे बसू शकतील असा या दगडी बाकाचा आकार आहे. उजव्या स्तुपा पासून सूरु होऊन ते डाव्या बाजूला असलेल्या स्तुपा जवळ परेंत आहे. डाव्या बाजूला असलेल्या स्तुपाचे चैत्यगृह अर्धवर्तुळाकृती दिसते. सध्या फक्त मोकळी जागा आहे. पूर्वी इथे मातीचा, विटानंचा, लाकडाचा स्तूप बनवला असावा आणि तो काळाचा ओघात नष्ट झाला आहे, असे अभ्यासकांचे मत आहे. जे मोकळे चैत्यगृह डाव्या बाजूला आहे. त्याचा आकार अर्ध वर्तुलाकार आहे. अशा प्रकारची रचना मावळ मधे काही ठिकाणी असून त्या मधे दगडी स्तुप आहेत. त्या अनुमानावरून त्याचा आकारावरून त्या जागेत स्तुप होता असे निरीक्षणा वरून दिसते. तसेच सुरवातीचा निर्मितीचा काळातला असल्यामुळे त्याकाळी सुरवातिला माति, विटा, लाकडा पासून स्तुप बनवत असत त्यामुळे तो नष्ट झाला आहे. उजवीकडील स्तुप दगडात कोरला असल्यामुळे त्याच अस्तिव टिकून राहीलेले दिसते. बहुतेक अपरिचित राहिल्यामुळे, कालानुसार तिथे तेथिल पूर्विचा लोकांनी नकळतपणे गडदची गुहा म्हणून उल्लेख करत असतिल किंवा डोंगाराचा कुशीत लपलेली असल्यामुळे, गडदची गुहा म्हणत असावे असे निरिक्षणावरुन वाटते. कारण गडद म्हणजे अंधार, गुप्त, अज्ञात, गूढ, अस्पष्ट, चकीत करणारा किंवा गोंधळात टाकणारा शब्द असा अर्थ आहे. त्यावरून असे निरीक्षणावरून वाटते की डोंगराचा कुशीत निर्सगाचा सान्निधात जतन' केलेला असा आहे. येगावापासून येळघोळ बुद्ध लेणी पर्यंतच अंतर 1 ते 2 कि.मी. चा आसपास आहे. या वाटेवरून जाताना विशेष करून पावसाळ्यात मन मोहक निसर्ग आणि मातीची पायवाट, त्यात वाहणारे पाणी बाजूला भाताचे शेत, सागाची झाडे, सुंदर निसर्गाचा आस्वाद घेत मातीचा चीखल पाण्यामध्ये तुडवत जातो एक वेगळाच अनुभव असतो. लेणीवर .. . . . पुढील माहिति पान क्र 2 वर . .. .

त्रिपिटक वार्ता साप्ताहिक ✍ परामर्शदाता मंडळ - प्रा. (डॉ.) प्रफुल्ल गडपाल, प्रा.डॉ.धम्मदीप वानखेडे, डॉ. कीर्तिराज लोणारे, प्रा. विजय मोहिते. संपादकीय मंडळ काय अमित मेधावी, प्रा. रितेश ओव्हाळ, आयु. सतीश पवार, आयु. स्वातीताई गायकवाड



**भारतीय बौद्ध महासभा श्रामणेरी बौद्धाचार्या. केन्द्र शिक्षिका , महाराष्ट्र राज्य संस्कार उपाध्यक्ष, धम्मलिपि संचालिका. निवास बांद्रा. 9730568539, त्रिरत्न निर्मित, 'स्वप्नकमलज इन्टरप्राइजेस' (इको फ्रेंडली क्लॉथस बॅग मेकर अॅन्ड सेलर, बौद्ध साहित्य विक्रेता.**

**आयुनी. स्वाती जगन्नाथ गायकवाड.**

👉वर्षावास- वस्सावास भगवान बुद्धांच्या कल्याणकारी मार्गापैकी एक मार्ग.

.'सुखो बुद्धानमुप्पादो, सुखा सद्धम्मदेसना। सुखा संघस्स सामग्गी, समग्गान तपो सुखो ।।.

.अर्थ- सुखकर (सुखद) आहे बुद्धांचा जन्म होने, सुखकर आहे बुद्धांचे सद्धम्मोपदेश ऐकणे, सुखकर आहे संघाची एकता त्याप्रमाणेच सुखकर आहे समुहाने तपने श्रम करणे.

आपण वर्षभर काहीना काही कार्य करत असतो. ते करत असताना आपल्या जीवनात अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. प्रत्येकाला त्यासमस्यांचे निराकरण हवे असते. त्या साठी अनेक मार्गाचा अवलंब केला जातो व्रतवैकल्ये, उपातापास, अनवाणी चालणे, निर्जली राहणे...इ. अनेक गोष्टी केल्या जातात. बदलत्या काळात मानवाची प्रगती झाली, विज्ञानाने प्रगती केली पण मानवी मन अनेक तृष्णायुक्त विकारांनी भारलेला असल्याने प्रगती होऊनही समस्या सुटलेली नाही अशा वेळी नेहमीच वाटते कोणीतरी यावे योग्य मार्गदर्शन करून आमच्या समस्यांचे निराकरण करावे. म्हणूनच .ज्याचा आरंभ, मध्य व अंत कल्याणकारक आहे असा कल्याणकारी मार्ग दाखवणाऱ्या बुद्धांचा जन्म होणे सुखद अनुभूती आहे. त्यांचे उपदेश ऐकणे, अनुकरण करणे सुखकर (सुखदायी आहे) त्याप्रमाणेच संघटीत राहणे (संघ) निर्माण करून एकोप्याने राहणे व समुहाने तपने (श्रम करणे) देखिल सुखावह ठरते.. यासाठी वर्षा ऋतू सुरू झाला की वर्षावास पर्व सुरू होते. या काळात अनेक विहारामध्ये ग्रंथ पठन व प्रवचन मालिका, शिबिरे यांचे आयोजन होते. उपासक-उपासिका या काळात धम्म श्रवण करण्यासाठी प्रयत्नशील असतात. बौध्द धम्मामध्ये वर्षावास काळाला विशेष महत्व असते.

.1)यासाठी वर्षावास म्हणजे काय? 2)वर्षावास कोणासाठी असतो ? 3)बौद्ध संस्कृती मध्ये त्याचे महत्व काय आहे? 4)वर्षाकाळात गृहस्थी मनुष्यांचे (उपासक-उपासिकांचे) कर्तव्य कोणते आहे?समजून घेणे आवश्यक आहे.

.→👉① वर्षावास म्हणने काय?.

वर्षा - वस्सा-पालिमध्ये वस्सा म्हटले जाते. वर्षा-वस्सा म्हणजेच पाऊस, वास म्हणजे राहणे, निवास करणे. वर्षाऋतु (पावसाळा सुरू झोला की या काळात चारिकेसाठी, लोककल्याणाचा बहुजनांच्या सुखाचा मार्ग सांगत चारिका, भ्रमण करणाऱ्या भिक्खुंनी एका ठिकाणी राहणे वास्तव करणे यास वर्षावास म्हणजेच वर्षा ऋतूत राहणे म्हणतात. गरज ही शोधाची जननी आहे गरजेतूनच संशोधनकार्याची सूरवात होते. जस जशी आवश्यकता असते तशी संशोधन कार्याला सूरवात होते. वेग वाढतो.

इ.स.पूर्व 563 सिद्धार्थ गौतमाचा जन्म झाला. बालपणापासून करुणा ,मैत्री, प्रेमभावनेने व्यापलेल्या मनाला माणसामाणसातील भेदभाव का आहे? माणसाने माणसाची पिळवणूक का करावी. क्षत्रियांनी एकमेकांशी लढावे का? असे अनेक प्रश्न त्याला पडत पण त्याच्या मनाला पटेल अशी उत्तरे मिळत नसत. मोठा झाल्यावर रोहिणी नदीच्या पाण्यावरून झालेल्या संघर्षांत 'मी देशत्याग करेन, पण युद्ध करणार नाही' अशी भूमिका घेतली. त्यासाठी देशत्यागाची शिक्षा स्विकारली. देशात्याग व देहदंड देण्यास शाक्य संघाची अ समर्थतता ओळखून

शेवटी स्वताच स्वताचा मार्ग शोधायचा या भावनेने जीवन जगण्यासाठी आवश्यक अन्नाचा सेवन करण्याचे ठरवले क्लेशकारक मार्गाचा त्याग केला आणि माता सुजातेने दिलेले खीरदान स्विकारले. परिव्रजा होऊन परिव्राजक झाला. राजा बिंबिसार राजाने आपले राज्य देण्याची तयारी दर्शवली पण त्याने उत्तर दिले "जगातील कलहामुळे मी घायाळ झालो आहे. त्यामुळे मला पृथ्वीचेच काय स्वर्गाचेही राज्य नको" पंचवर्गिय परिव्राजकांनी युद्ध मिटल्याची शांततेची वार्ता आणली. युद्ध मिटल्यामुळे तो घरी जाऊ शकत होता परंतू आपल्या निश्चयावर तो ठाम होता, दृढ होता, तरीही परिव्राजक गेल्यानंतर त्याने सखोल चिंतन केले तेव्हा त्यास मानवी कलहांची विविध रूपे दिसून आली. कलह फक्त दोन राज्यात नसुन प्रत्येक मानवांत होत आहे व या समस्येचे (कलहाचे) कारणच मला शोधायचे आहे. हाच त्याचा संकल्प होता. याच गरजेतून विविध मार्गाच्या अवलंब करून त्याने शोधकार्य सूरू केले. परिक्षण निरिक्षण केले पण त्या काळी अस्तित्वात असलेल्या कोणत्याच पंथाचे मार्ग उपयोगी नसल्याचे त्यास जाणवले. तेव्हा तपस्येचा मार्ग देखिल अवलंबला पण त्यात त्याला अस्थीपंजरताच निर्माण झाली. स्वतःच स्वतःचा मार्ग शोधण्यास सुरवात केल्यानंतर त्याच्या अथक प्रयत्नांमुळे त्यास ज्ञानप्राप्ती झाली. तो प्राणी जो झाडाच्या फांदीवर (शाखेवर) राहतो,

**पुढील अंकात . . . . .**

---

## पान क्र 1 वरील माहिती .. . . . . .

जाताना पावसाळ्यामध्ये मधेच येणारा ओढा पार करून पलीकडे जावे लागते ( हा ओढ्यावर स्थानिक संवर्धक ह्यांनी मिळून लेनीवर जाण्यासाठी बांध बांधला होता.) पाण्याचा प्रव्हामुळे सुरवातीचा भाग वाहून गेला होता. जून २०२४ मध्ये पाहण्यात येत होते. आता तो चांगल्या प्रकारे बनवण्यात आला आहे. पावसाळ्यात लेणीवर जाण्यासाठी या वाटेवरून मार्गस्त होत चालत निर्सर्ग सौदंर्य न्याहाळत आपण कधी लेणीवर येऊन पोहचतो समजत नाही. पण त्या लेणीचां बाजूला धबधबा आहे त्याचे पाणी ओढ्याचा स्वरूपात पावसाळ्यात वाहते ते पार करून जाणे अवघड आहे. तरी त्या ठिकाणी समस्थ लेणी संवर्धक हयांनी मिळून सिमेंटचे २ गोल पाईप टाकून पाणी जाण्यासाठी मार्ग केला आहे. त्यातील १ पाइप भग्न झाला आहे. त्या पाईपचा बाजूने दगड टाकून बांध तयार केला आहे. लेणीवर पोहोचण्यासाठी, इतर ऋतू मध्ये अडचण नाही, पण पावसाळ्यात लेणीचा बाजूला लागून ओढा पार करणे जिकरीचे असते कारण धबधबा हयांचे पाणी प्रवाहित होत असते. पार करणे जिकरीचे असते पण आता तातपुरत्या स्वरूपात बांध बांधला आहे. पण त्या ठिकाणी कायम स्वरूपी काही उपाय योजना करणे गरजेचे आहे.

पावसाळ्यात तर सौंदर्य तर पाहण्यासारखे असते. येलघोल बुद्ध लेणीवर पोहचल्यावर पूर्ण परिसर निरामय शांतता पाहून मन प्रफुलीत होते. बौद्ध लेणीवरील भिक्खूसंघ, अरंहनत हयांचा ऊर्जा तरंग हयांचा भास होतो. त्यांचा सान्निध्यात असल्याचा मनाला प्रसन्न भाव निर्माण होतो. बाजूलाच पावसात वाहणारा धबधबा, त्याचा आवाजाचा ध्वनी तरंग, सभोवतालचे हिरवेगार झाडे लेणीवर असणारी निरव शांतता, एक वेगलच मन मोहक वातावरण, एकप्रकारे मन प्रफुल्लित करतात. येलघोल बुद्ध लेणीचा निर्मती पासून सोबत असल्याचे संकेत देतात. लेणीचा आत मध्ये शिरल्यावर उजव्या साईडला बुद्ध स्तूप दिसतो. तो हिनयान पंथीयांचा आहे. महाराष्ट्रात ज्या अर्धवट गुहा, लेणी सापडतात, त्यातलिचही एक जी सुंदर कलाकृती निर्मिती होता होता राहीलेली दिसते. प्रथम दर्शी असे दिसते. इ.स.पु.१ ते २ शतकाचा आसपास निर्मितीचा काल असू शकते, म्हणजेच सुरवातिला जो लेण्या निर्माण करण्याचा काल असावा, त्या वेळी ही लेणी इतरत बघून लेण्या पाहूण बनवण्याचा प्रयत्न झाला असे निरिक्षणा अंती वाटते. असे अभ्यासकांचे मत आहे. तसेच ही दगडात नैसर्गिक गुहा असावी असे दिसते. नंतर त्यात लेणी बनवण्याची प्रक्रिया झाली आहे.

ही लेणी खडकात अर्धा स्वरुपात आहे. ही येलघोल बुद्ध लेणी सरळ अशा थोडया वर्क अर्ध वर्तुलाकार आकारात लांब आहे. उजव्या बाजुला एक दगडात कोरलेला स्तूप आहे, पण तो इतर स्तुपा प्रमाणे त्यावर कोरीत काम दिसत नाही. खाली फक्त जोथा त्यावर अंड असे स्वरूप दिसते. इतर ठिकाणी स्तुपाचा खालचा भाग मोठा असतो, जास्त उंच असतो पण हया स्तुपाचा अंडाचा खालचा भागाची उंची कमी आहे. म्हणजेच जोथा भागाची उंची कमी आहे. त्यावर अंड आहे, हयावर इतर स्तुपा पेक्षा हा वेगळा आहे दगडात कोरून निर्माण केला आहे. अंड्याचा वरचा भागात तिन खोबन दिसतात त्यात अरंहनत, भिकू यांच्या अस्थी ठेवण्यात येत असत, हा शारीरिक स्तूप आहे. तसेच स्तुपाचा वरती अंड्यावर तीन खोबन आणि खोबनचा मध्य भागी चौकोन असून छिद्र आहे. त्या छिद्रांत लाकडी हार्मिका असावी आणि काळाचा ओघात ती नष्ट झाली आहे. हया स्तुपाची उंची साधारण पणे साडे 5 फूट ते 6 फूट हया दरम्यान आहे.

लेणीचा वरति गजपृष्ठ छत आहे ,पण पूर्ण सपाट नाही आहे. चैत्यगृह ही पूर्ण नसुन अर्ध आहे. स्तुप चैत्यगृह आहे, ते अर्ध वर्तुळ असते त्या आकारात असुन स्तुपा भोवती प्रदक्षिण करण्यासाठी थोडी जागा ठेवण्यात आली आहे. स्तुप हा पूर्ण गुळगुळीत इतर स्तूप असतात त्या प्रमाणे दिसत नाही, त्या वर कोरीव काम दिसत नाही, त्यावर खडबडीत छीन्नी घावाने कोरतात तासतात तसे चिन्ह खूना दिसन्यात येतात. येलघोल बुद्ध लेणी पूर्वी नैसर्गिक गुहा असावी, त्यावेळी भिक्खू आणि व्यापारी जिथे पाण्याची व्यवस्था आहे.

अश्या ठिकाणी त्यानंचा निवाऱ्या साठी भिक्खू हयांचा वर्षावासा साठी, निवाऱ्यासाठी लेणीची निर्मिती केली जात असत, त्या वरून या गुहेत मानव निर्मित लेणी बनवली गेली, या लेणी मध्ये उजव्या आणि डाव्या दोन्ही बाजूला स्तुप आणि दोघांचा मधे लांब दगडी लांब बाक अशी रचना बनवण्यात आली आहे. उजवा स्तुप चैत्य गृहात अजून शाबूत आहे. डाविकडील स्तुप नष्ट झाला आहे. तसेच दगडी बाक आहे, त्या समोर काही चौकोनी खोबन टाईप खड्डे, चिन्ह दिसतात. त्यावरून असे दिसते की इथे लाकडी खांब असून, रूम प्रमाणे ते केले असावे आणि इथे भिक्खू हयांचा वावर होता. त्यांना एकत्र बसण्यासाठी दगडी बाक बनवले गेले. त्याचा समोर लाकडी खांब लावून लाकडाचे पार्टीशन करून त्याचा पुढे रूम बनवला गेला होता आणि कालाचा ओघात ते लाकडी बांध काम नष्ट झालेले आहे. असे निरिक्षणावरून दिसते. येलघोल बुद्ध लेणी अंदाजे १५ मीटर रुंद ते समोरून 8 मिटर खोल आणि ऊंची अंदाजे 3 मीटरचा आसपास आहे. समोरचा भाग जमिनीचा नेसर्गिक आहे तसाच आहे. डाव्या बाजूला धबधबा आहे. हा पावसाळ्यात प्रवाहित असतो. त्यामुळे लेणीचे सौन्दर्यात भर पडते आणी तो साक्ष देतो, ह्या लेणीचा निरमितीचा कालापासून मी सोबत आहे. तसेच लेणीचा भिंतीवर, बसण्याचा दगडी बाकाचा पाठी काही काला पूर्वी, भिंतीवर काही चित्रे स्वरूप आकृत्या जसे कि गणपती आणि हनुमान अशा धूसर दिसतात, बाकी वेगळ्या प्रकारचा दिसतात. निरीक्षणा वरून असे दिसते लहान मुळे चित्र काढतात, तश्या प्रकारचा आकृत्या काढलेल्या दिसतात. त्या कोरण्याचा प्रयत्न झाला झालेला दिसतो. तसे असले तरी हि हीनयानच बौद्ध लेणी आहे. एकजूट लेणी अभ्यास प्रचार समूह महाराष्ट्र राज्य ह्यांचा आयोजनात सर्व लेणी संवर्धक समुहानी एकत्र रित्या सर्वांना माहीती पडण्यासाठी माहिती फलक, दिशा दर्शक फलक लावण्यात आले होते. तसेच स्थानिक संवर्धक ह्यांनी धबधब्या जवळ सुरक्षेचा दृष्टीने लोखंडी पाईप लावण्यात आले पण ते तग धरू शकले नाही तरी संवर्धकामुळे, अभ्यासकामुळे हा वारसा जगा समोर येत आहे. या येलघोल अपरिचित बौद्ध लेणीचा उल्लेख जेम्स फर्ग्यूसन असो वा जेम्स बर्गेस, कनिंघम ह्यांचा माहीती मध्ये कुठेच उल्लेख केलेला सापडत नाही, ना कोणत्या लेणी विषयी पुस्तकान मध्ये पूर्ण माहिती वा उल्लेख सापडत नाही, तरी तो आता संवर्धक, अभ्यासकामुळे आणि डोंगर दरीतला फि्रिस्ती मुळे जगासमोर लोकांन समोर येत आहे.

लेणीवर जाण्यासाठी निट रस्ता नाही आहे. तरी पुरात्व खात्याने लक्ष देवून जो अपरिचित लेणी जगा समोर येत आहे, त्याला भेट देण्यासाठी संवर्धक, अभ्यासक, उपासक, उपासिका आणि पर्यटक आणि डोंगर दरीतला फि्रिस्ती भेट देत आहे. त्यांचासाठी सर्वांची अपेक्षा आहे. ऐलघोल गावापासून एलघोल बुद्ध लेणी पर्यंत, पुरातत्व खाते लक्ष घालून रस्ता निट करून दयावे, तसेंच मधेच लागणार ओढा आणि लेणीवर जाण्यासाठी धबधब्याचे पाणी वाहते, त्या ओढ्यावरून लेणीवर पोहोचण्यासाठी कामय स्वरूपी उपाय योजना करणे गरजेचे आहे. म्हणजे पर्यटक , अभ्यासक, संवर्धक ह्यांना या लेणीवर भेट देण्यास सुलभ होईल. तसेच पावसाळ्यात धबधब्यावर सुरक्षेचा दुष्टीने बॅरीकेट लावावे. आपला वारसा जपावा तसेच या लेणीवर कोणताही शिलालेख सापडलेला नाही. तसेच ही लेणी लोंकानी बांधली. कारण सर्वत्र छिन्नीचे निशान दिसतात कुठेही सपाट केलेले गुळगुळीत केलेले दिसत नाहीत आणि स्तुपावर सुद्धा आणि कोणत्याही ठिकाणी परिसरात नक्षीकाम ना शिलालेख दिसत आहे. त्या वरून असे दिसते ही लोकांनी बांधली आहे दानातून नव्हे. चक्रवर्ती सम्राट अशोक ह्यांनी आपल्या साठी लेणी, स्तूप, शिल्प, शिलालेख, स्तंभलेख लोखंडी लेखनीने लिहून आपल्या साठी ठेवले आहेत. ते जपणे आपले कर्तव्य आहे आणि जे अपरिचीत लेणी उजेडात येत आहे. ति जपून जगासमोर आणने त्याचे संवर्धन करने आपली जिम्मेदारी आहे. तसेच या लेणीवर संशोधन होणे गरजेचे आहे. हया भागात आसपास अजून काही लपून राहीलेला दडलेला आपला इतिहास असू शकतो, जगा समोर येण्यासाठी आपली वाट पहात असेल,

माझी लेकरे येतील आणि मला शोधून जगा समोर आणतिल, माझे संवर्धन करतिल, आपला इतिहास, वारसा जन माणसात, मुला, बाळात पोहचविला पाहिजे. ते आवाज देत आहेत या लेकरांनो आपला इतिहास जगा समोर आणण्यासाठी, संवर्धन करण्यासाठी, पुढचा पिढीला आपला इतिहास वारसा माहित पडण्यासाठी, या एक पाऊल टाका आपला इतिहास जपण्यासाठी. तरी अशा किती अपरिचित लेणी असतिल ,आपल्याला माहीत नसेल त्या लेण्या आपली वाट पाहत असतील, उजेडात येण्यासाठी. डोंगर दरीतला फि्रिस्ती, लेणी संवर्धकांमुळे, अभ्यासकामुळे अपरिचित लेण्या उजेडात येत आहे. तो वारसा इतिहास जोपासने गरजेचे आहे. प्रत्येकाने घरा-घरात प्रत्येक बुद्धविहारात सम्राट अशोक उपक्रम राबवावा, प्रतिमा लावावी. आपला इतिहास जनमानसात पोहचवावा कारण प्रत्येकाला सम्राट अशोक समजावे, त्या मार्फत आपला इतिहास समजावा. कारण त्यांचा मुळे जगभर बौद्ध धम्म पसरला आहे. आपला इतिहास आपल्यासाठी लिहून, कोरून ठेवला आहे त्याला अतिक्रमापासून वाचवून, संवर्धन करून, अपरिचित लेणी जगा समोर आणून जतन करून पुढच्या पिढीला पाहण्यासाठी संवर्धन करने आपला इतिहास, वारसा, जपने आपली जिम्मेदारी.

( या येलघोल बौद्ध लेणीवर येण्यासाठी कोणती साधने नाही आहेत. येण्यासाठी खाजगी वाहनाने यावे. तसेच या लेणी परेंत पोहोचण्यासाठी पुरातत्व खाते हयांनि दखल घेऊन सरकार मार्फत या येलघोल बौद्ध लेणी परेंत पोहोचण्यासाठी साधने निर्माण करावीत. लेणी परेंत पोहोचण्यासाठी नीट रस्ता तयार करावा.)

---

## 🌿 झेन कथा: दो भिक्षु और एक स्त्री

एक बार एक झेन गुरु और उनका शिष्य नदी के किनारे से जा रहे थे।
रास्ते में उन्हें एक स्त्री मिली, जो नदी पार करना चाहती थी,
लेकिन नदी का बहाव तेज था और वह बहुत डर रही थी।
गुरुजी ने उससे पूछा,
"क्या तुम चाहो तो मैं तुम्हारी मदद करूं?"
वह बोली, “हां, कृपया मेरी मदद कीजिए।”
गुरुजी ने बिना कुछ कहे उसे अपनी पीठ पर उठाया,
नदी पार करवाई और उसे दूसरे किनारे पर उतार दिया।
फिर वे अपने शिष्य के साथ आगे बढ़ गए।
शिष्य यह सब देख रहा था, पर चुप था।
करीब दो घंटे बाद वह बोल पड़ा:
"गुरुजी, हम भिक्षु हैं। हमें स्त्रियों से दूर रहना चाहिए।
फिर आपने उस स्त्री को क्यों उठाया?"
गुरुजी मुस्कराए और बोले:
"मैंने उसे नदी पार करके वहीं छोड़ दिया...
लेकिन तुम अभी भी उसे अपने मन में उठाए हुए हो!"

🌱 कहानी से सीख:
बीती बातें छोड़ देना सीखो।
जो काम उस समय ज़रूरी था, वह पूरा किया।
लेकिन अगर हम मन में उसे पकड़े रहेंगे,
तो शांति कभी नहीं मिलेगी।

---

**यो बालो मञ्ञति बाल्यं, पण्डितो वापि तेन सो।**
**बालो च पण्डितमानी, स वे ‘‘बालो’’ति वुच्चति॥**

मराठी अर्थ:

जो मूर्ख असून स्वतःला मूर्ख समजतो, तो त्या जाणिवेमुळे खरोखर ज्ञानी ठरतो.

पण जो मूर्ख असून स्वतःला पंडित समजतो, तोच खरोखर 'मूर्ख' (बालो) असे म्हणवतो.

## भारतीय संविधान - एक आकलन

**संकलन व मांडणी-**
**संजय रामचंद्र साळुंके**
**कला,वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, वलवन,लोणावळा**

"संविधान कितीही चांगले असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते जर अप्रामाणिक असतील तर ते वाईट ठरल्याशिवाय राहणार नाही.तसेच संविधान कितीही वाईट असो, ते राबविण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे ते जर प्रामाणिक असतील, तर ते चांगले ठरल्याशिवाय राहणार नाही."

दिल्ली येथे २५ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेतील बाबासाहेबांच्या वरील अवतरणातुन संविधान राबविणारे किती महत्वाचे आहेत याचे दर्शन घडते. जगातील सर्वात मोठे लोकशाही प्रजासत्ताक गणराज्य भारताचे आहे. सुमारे १३०+ कोटी लोकसंख्येतील विविधता व भेदाभेद एकाच विधी-विधानानुसार अनुशासित केले जाते. ते विधिविधान म्हणजे भारतीय संविधान.

भारतीय संविधान हे संविधान सभेतील चर्चा व वादविवाद या अनुषंगाने विचार केल्यास ते एक मोठे विचारमंथनच होते. या विचारमंथनातुन अर्थातच कॉन्स्टीट्युअंट असेंब्ली डिबेट्स मधुन संविधानातील कोणत्याही समस्येचे निराकरण करता येते. म्हणुन राबविणारा सुज्ञ व तज्ञ असावा लागतो.

संविधान सभेच्या कामकाजाचा संपुर्ण अहवाल Constituant Assembly Debates - Official Report ( इंग्रजी भाषेतील ५ खंड ) व भारतीय संविधान सभा के वादविवाद की सरकारी रिपोर्ट ( हिंदी भाषेतील १० खंड ) या स्वरुपात लोकसभा सचिवालयात उपलब्ध असतो. संविधान राबविणाऱ्यांकडुन यांचे वाचन-चिंतन-मनन होणे अत्यावश्यक आहे.

भारतीय संविधान हे संविधान सभेच्या माध्यमातुन अस्तित्वात आले आहे. त्यामुळे संविधान सभेचा थोडक्यात इतिहास जाणुन घेणे आवश्यक आहे.

सर्वप्रथम २० ऑगस्ट १९१७ साली ब्रिटीश सरकारने भारताला क्रमाक्रमाने स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली होती व १९/०२/१९४६ रोजीच्या कॅबिनेट मिशन मंत्रिमंडळ योजनेद्वारे संविधान सभेचा प्रस्ताव घोषित करण्यात आला होता. दरम्यानच्या कालखंडात १९२८ साली श्री.मोतीलाल नेहरु यांच्या अध्यक्षतेखाली नेहरु घटना समिती स्थापन झाली होती. मात्र काँग्रेसने तयार केलेला घटना समितीचा आराखडा अस्पृश्य, मुसलमान व मागासवर्गीय नेत्यांनी सपशेल नाकारला होता. पुढे भारतातील संवैधानिक समस्यांच्या निराकरणाकरिता क्रिप्स योजना ( १९४२ - सर स्टेफर्ड क्रिप्स ) आली. मात्र ती सुध्दा अव्यावहारिक होती. या व इतर सर्व घडामोडींसंदर्भातील समस्या व उपाययोजना बाबासाहेबांनी आपल्या दि कम्युनल डेड्लॉक अँड वे टु साल्व इट या भाषणात सांगितल्या आहेत. १९४५ - ४६ दरम्यान केंद्रीय व प्रांतिक विधीमंडळाच्या निवडणुका झाल्या ज्यात काँग्रेससोबत मुस्लिम लीग ही एक राजकीय शक्ति उदयास आली. मात्र अस्पृश्यांना अपेक्षित यश मिळाले नाही. ही प्रांताप्रांतांची विधिमंडळेच पुढे संविधान सभेसाठी निर्वाचक मंडळ म्हणुन गृहीत धरण्याचा व्यावहारिक मार्ग सुचविला गेला. यांच्या साहाय्याने संविधान सभेसाठी ३८५ सदस्य निवडण्याचे ठरले.

पैकी २९२ सदस्य हे भारताच्या ११ प्रांतांचे प्रतिनिधी व ९३ सदस्य संस्थानिकांचे प्रतिनिधी ( यातील ४ प्रतिनिधी हे कमीशनरेट मधुन नियुक्त केले जाणारे ) होते. अशाप्रकारे २९६ जागांसाठीची संविधान सभेची पहिली निवडणुक ८ जुलै ते ऑगस्ट १९४६ पर्यंत पुर्ण होऊन संविधान सभेचे प्रथम सत्र ९ डिसेंबर १९४६ रोजी सुरु झाले. हे संपुर्ण कामकाज वर उल्लेख केलेल्या कॅबिनेट मिशन मार्फत झाले ज्यामध्ये लार्ड पेथिक लॉरेंस, सर स्टेफर्ड क्रिप्स व ए. व्ही. अलेक्झांडर हे मंत्री होते. संविधान सभेचा संपुर्ण कालखंड हा ९ डिसेंबर १९४६ ते २४ जानेवारी १९५० या दरम्यान म्हणजेच २ वर्षे ११ महीने आणि १७ दिवस असा असुन त्यासाठी संविधान सभेची ११ सत्रे, १६५ बैठका संपन्न झाल्या असुन एकुण खर्च रु. ६३,९६,७२९ झाला. या संविधान सभेचे स्थायी अध्यक्ष होते डॉ. राजेंद्र प्रसाद.

कॅबिनेट मिशन ने केलेल्या शिफारशीनुसार संविधान सभेने ५० सदस्यांची एक सल्लागार समिती गठीत केली. ज्याकहे अध्यक्ष सरदार पटेल हे होते. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. कार्याच्या सोयीच्या दृष्टीने सल्लागार समितीने ज्या विविध समित्या / उपसमित्या नेमल्या त्यातील संघ संविधान सभेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सदस्य होते. या व इतर समित्यांवरील बाबासाहेबांच्या कार्याचा ठसा पाहता कॉंग्रेस नेत्यांना खात्री पटली की, डॉ. बाबासाहेबांच्या सेवा घेतल्याशिवाय स्वातंत्र्याचे दृढीकरण व विधिनियमिकरण सहज व सुलभ होणार नाही. म्हणुन बंगालच्या विभाजनामुळे बाबासाहेबांचे संविधान सभेचे सभासदत्व रद्द झाले असुनही संविधान सभेचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी मुंबईच्या मुख्यमंत्र्यांना ( श्री. जी. बी. खेर ) पत्र पाठवुन बाबासाहेबांची जुलै १९४७ मध्ये संविधान सभेवर पुनर्नियुक्ती करवुन घेतली.

लगेच स्वतंत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री पं. जवाहरलाल नेहरु यांनी स्वतंत्र भारताचे प्रथम विधिमंत्री म्हणुन बाबासाहेबांची नियुक्ती केली व २९ ऑगस्ट १९४७ रोजी संविधान सभेने एकमताने बाबासाहेबांची संविधान मसुदा समितीच्या अध्यक्षपदी निवड केली. या समितीने संविधानाचा मसुदा आलेखित केला. मसुद्यात प्रत्येक अनुच्छेद - त्याची उजळणी - त्यांचे पुनर्लेखन असे हे कार्य १३ फेब्रुवारी १९४८ पर्यंतच्या ४४ बैठकांमध्ये संपुर्ण पार पडले. व हा प्रथम मसुदा २१ फेब्रुवारी १९४८ ला अध्यक्षांना सादर केला. हे संविधानाचे प्रथम वाचन होते. त्यानंतर १५ ऑक्टोंबर १९४८ रोजी पासुन दुसरे वाचन आणि १४ नोव्हेंबर १९४९ पासुन तिसरे वाचन झाले. व अशाप्रकारे अंतिमतः नोव्हेंबर १९४९ मध्ये संविधान निर्मितीचे कार्य पुर्ण झाले. या संपुर्ण कामात मसुदा समितीचे इतर ६ सभासद हे फक्त नामधारी कसे होते हे २५ नोव्हेंबर १९४९ च्या संविधान सभेतील भाषणांच्या अवलोकनातुन कळते. म्हणुन बाबासाहेब डॉ. बी. आर. आंबेडकर हेच भारतीय संविधानाचे शिल्पकार आहेत. "माझे जीवनविषयक तत्वज्ञान तीन शब्दांतच समुर्त झाले आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव. फ्रेंच राज्यक्रांतीवरुन माझे जीवनविषयक तत्वज्ञान मी उसने घेतले आहे असे मात्र कोणी समजु नये. माझ्या तत्वज्ञानाचे मुळ राजकारणात नसुन धर्मात आहे. माझे गुरु भगवान बुद्ध यांच्या शिकवणीतुन हे तत्वज्ञान मी स्वीकृत केलेले आहे."

नवी दिल्ली येथे दिलेल्या १९५४ मधील भाषणांतील हा अंश आपणास जाणिव करुन देतो की, बाबासाहेबांच्या प्रत्येक मांडणीचा मुख्य स्रोत तथागत बुद्ध आहेत. भारतीय संविधानावरही आपणास हा प्रभाव आढळतो.

भारतीय संविधान अस्तित्वात येण्यापुर्वी भारतात न्यायव्यवस्था वा विधीसंहिता होती. असे असतानाही नव्याने विधिविधान वा संविधान निर्मितीची आवश्यकता का भासली याचे उत्तर शोधताना जरा भूतकाळात डोकवावे लागेल. प्राचीन भारतातील न्यायव्यवस्था दोन विचारधारांवर आधारीत असल्याचे दिसते...१) वैदिक विचारधारा २) अवैदिक विचारधारा वैदिक विचारधारेनुसार धर्म हा प्रधानस्थानी होता. वेद - स्मृतिग्रंथ - पुराणे यातील धर्मच कायदा होता. राजा व राज्यसंस्था धर्मपालनातच लोककल्याण आहे या मतावर ठाम होती. धर्म हाच कायदा होता व कायदा हाच धर्म होता. म्हणुन वर्णव्यवस्था, स्री - पुरुष असमानता, अस्पृश्यता, राजेशाही, विषमता इ. धार्मिक बाबी न्यायसंमत होत्या. याउलट अवैदिक विचारधारा लोकतांत्रिक स्वरुपाची दिसते. लोकसहभागातुन लोककल्याण यांवर या विचारधारेचा भर आढळतो. राजा व राज्यसंस्था लोक कल्याणाला महत्व देताना आढळतात. खऱ्या अर्थाने बहुजन हिताय - बहुजन सुखाय अशी ही लोककल्याणकारी विचारधारा आहे.

इंग्रज शासनकाळापर्यंत म्हणजे वेदकाळ - बुद्धकाळ - अशोककाळ - प्रतिक्रांती काळ इ. मध्ये आपणास याच दोन विचारधारा प्रामुख्याने दिसतात.

इंग्रजी राजवटीमध्ये - ईस्ट इंडिया कंपनी व सन १६०० ची सनद, रेग्युलेटींग ॲक्ट १७७३, चार्टर ॲक्ट १७९३ / १८१३ / १८३३ / १८५३, गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट १८५८, इंडियन कौन्सिल ॲक्ट १८६१ / १८९२ / १९०९, गव्हर्मेंट ऑफ इंडिया ॲक्ट १९१९ इ. विविध विधिनियम भारतीय उपखंडात लागू होते. व त्यावर आधारीत न्यायव्यवस्था होती. अशा प्रकारची विधीविधाने अस्तित्वात असतानाही बाबासाहेबांनी घटना मसुदा समितीच्या माध्यमातुन बव्हंशी अवैदिक विचारधारेवर भर देणारी नवीन घटना निर्माण केली.

१९४५ च्या मुंबई येथील दि कम्युनल डेड लॉक अँड वे टु साल्व इट या आपल्या भाषणात बाबासाहेब म्हणतात -

१) भारतीय लोकांनी, भारतीय लोकांसाठी, भारतीय लोकांच्या इच्छेनुरुप, भारतीय जनतेची अनुमती घेऊन घटना तयार करावी.

२) घटनेची मूलतत्वे पुढीलप्रमाणे असावी - अ) बहुसंख्यकांचा राज्यकारभार तात्विकदृष्ट्या ग्राह्य नसून व्यवहार्यदृष्ट्या अन्यायकारक आहे. बहुसंख्य जमातीला प्रतिनिधित्वाच्या दृष्टिने सापेक्ष बहुसंख्यत्व देता येईल. परंतु तिला कधीही पुर्णपणे बहुसंख्यत्वाच्या जोरावर भरमसाठ प्रतिनिधित्व देता येणार नाही. ब) जागेची विभागणी अशा दृष्टीने केली पाहिजे की, बहुसंख्य जमात व इतर कोणतीही एक प्रतिष्ठित अल्पसंख्य जमात यांच्या एकजुटीमुळे बहुमत तयार होता कामा नये, की ज्यामुळे इतर अल्पसंख्य जमातीच्या हितसंबंधाबद्दल इंद्रजाल तयार होइल. क) जागेची विभागणी अशा दृष्टीने केली पाहिजे की, बहुसंख्यकावर अवलंबून न राहाता अल्पसंख्यांक जमातींनी आपली एकजुट केली तर त्यांना स्वतःचे सरकार प्रस्थापित करता यावे. ड) बहुसंख्य जमातीकडून ज्या जादा जागा काढून घेण्यात आल्या आहेत, त्यांची अल्पसंख्यांक जमातींमध्ये व्यस्त प्रमाणात विभागणी केली पाहिजे.

बाबासाहेबांच्या या दुरदृष्टीचा विचार करणे हे संविधान राबविणाऱ्यांसाठी आवश्यक आहे.

भारतीय संविधान हे एकीकडे राज्यव्यवस्थेची अधिमान्यता प्रस्थापित करते तेव्हा दुसरीकडे राज्यव्यवस्था नागरिकांचे अधिकार हिरावुन घेणार नाही याचीही काळजी घेते. म्हणून हे उदारमतवादी संविधान आहे, जे भारतीय नागरिकांना सन्मानाची हमी व विकासाची संधी देणारे आहे. भारतीय संविधानाच्या सरनाम्यात आपणांस संविधानाची उद्दिष्टे व मानवतेची मूल्ये पाहावयास मिळतात. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेची सुरूवात -आम्ही भारताचे लोक - अशी केलेली आहे.

यातुन व्यक्तिला दिलेले प्राधान्य दिसते. आमचे अधिकार आम्हाला कोणा राजाने वा परमेश्वराने बहाल केलेले नसून हे अधिकार म्हणजे आम्ही भारतीयांनी एकमेकाच्या माणूसपणाला दिलेली मान्यता आहे.

यातून - सर्व भारतीय एकसाथ पुढे जाण्यास सज्ज व्हा - असा अर्थ ध्वनीत होतो. व तशी आपण सवय लावुन घ्यायला हवी. उद्याचा भारत सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष व लोकशाही गणराज्य करण्याचा आमचा संकल्प आम्ही एकत्र राहून पुर्ण करणार आहोत. हेच आमच्या संविधानाचे व पर्यायाने सर्व भारतीयांचे उद्दिष्ट आहे. सर्व भारतीयांना -सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय,विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता प्राप्त करुन देण्याचा आमचा संकल्प असावा. व या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा आम्हा सर्वांचा निर्धार हवा. एका अर्थाने ही न्याय - स्वातंत्र्य - समानता व बंधुता आमची मूल्ये आहेत. यातील स्वातंत्र्य - समता - बंधुता ही मूल्ये वेगवेगळी करता येत नाही. फक्त स्वातंत्र्य हवे असा विचार केला तर समाजातील धनदांडगे त्याचा गैरफायदा घेतील व आर्थिक, दुर्बल व स्रिया मागेच राहतील. फक्त समता असेल व स्वातंत्र्य नसेल तर वैयक्तिक कर्तृत्व दाखविता येत नाही. तसेच कायद्याच्या जोरावर स्वातंत्र्य व समता आणण्याचा प्रयत्न ही वरवरचा आणि तकलादू ठरतो. त्याकरता बंधुभाव आवश्यक असतो. म्हणुन बंधुभाव अंतर्भुत असलेली समानता व त्यातुन मिळालेले स्वातंत्र्य हे नैसर्गिक वाटते. भारतीय संविधान आपल्यातील या बदलाची अपेक्षा करते.

भारतीय संविधान जसे आपणांस मूलभुत अधिकार ( कलम १२ ते ३५ ) प्रदान करते तेव्हा नागरिकांना मूलभुत कर्तव्याचे पालनही करायला सांगते ( कलम ५१ क - ४२ वी घटना दुरुस्ती ).

भारतीय संविधान नागरिकांकडून पुढील अपेक्षा करते - राष्ट्रध्वज व राष्ट्रगीताचा आदर, स्वातंत्र्यलढ्यातील आदर्शांची जोपासना, देशाच्या सार्वभौमतेचे आणि एकतेचे संरक्षण, सामंजस्य व बंधुभावाची भावना, भारताच्या संमिश्र संस्कृतीच्या वारशाचे जतन, पर्यावरणाचे रक्षण, विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन व सुधारणावाद यांचा विकास, हिंसाचाराचा त्याग, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान टाळणे, महिलांच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणणाऱ्या रुढी-परंपरा व प्रथांचा त्याग इ.

भारतीय संविधान नागरिकांकडुन अशीही अपेक्षा करते की, प्रत्येक व्यक्तिने आपल्या कार्यक्षेत्रात उत्तुंग यश संपादनाचा प्रयत्न करावा. ज्यातुन राष्ट्र यशाचे शिखर गाठेल आणि याकरता वेळेची शिस्त पाळणे, ठरलेली कामे वेळच्यावेळी पुर्ण करणे, कामात नाविन्यता आणणे, कमी वेळेत - कमी साधनसुविधेत - कमी उर्जा वापरुन काम पुर्णत्वास नेणे इ. उपाय आवश्यक आहे.

ही कर्तव्ये पार पाडण्याचे कायदेशिर बंधन आपणावर नसले तरी राज्यांनी व व्यक्तींनी तशी बंधने आपणहुन लावुन घेणे आवश्यक आहे. हीच खरी राष्ट्रभक्ती आहे.

धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, आदिवासी समाजाचा विकास, आरक्षण इ. विषयीचे ज्ञानही भारतीय संविधानात अंतर्भूत आहे. .. ..

पुढील माहिती पान क्र 4 वर .. . . . . .

## प.पु.बोधिसत्व "डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथांमधील पालि भाषा, संभाषण व व्याकरण : एक अभ्यासमालिका"

**GENERAL CONVERSATION,**

साधारण सल्लापो।

1. Do you know Pali ?
त्वं पालिभासं जानासि ?।

2. I know a little:
अहं थोकं जानामि।

3. Are you able to converse in Pali ?
सक्कोसि त्वं पालिभासाय सल्लपितुं ?।

4. Yes, I am able to converse a little:
आम, थोकं सल्लपितुं सक्कोमि ।

5. What is your name ?
युव्हं नामं किं? किंमो नामेसि ?।

6. My name is Vijayabahu;
अहं विजयबाहू नामो म्हि।

7. Where do you live ?
त्वं कथं वससि ?।

8. I live in Colombo;
अहं कोळम्बनगरे वसिमि ।

9. What is your age ?
तुम्हें आयुप्पमाणं कित्तं ?।

10. My age is fifteen
मय्हं आयुप्पमाणं पण्णरस ।

11. How old are you ?
कतिवस्सोसि त्वं (आयुना) ?।

12. I am twenty years old;
अहं वीसति वस्सोऽम्हि ।

13. Where do your parents live ?
तुम्हं मातापितरो कुहिं वसन्ति ?।

1. तुला पाली भाषा येते का?
2. मला थोडी थोडी येते.
3. तुला पाली भाषेत बोलता येते का?
4. हो, थोडं बोलता येतं.
5. तुझे नाव काय आहे?
6. माझं नाव विजयबाहू आहे.
7. तू कुठे राहतोस?
८. मी कोलंबो शहरात राहतो.
९. तुझे वय किती आहे?
१०. माझे वय पंधरा आहे.
११. तू वयानं किती वर्षांचा आहेस?
१२. मी वीस वर्षांचा आहे.
१३. तुझे आई-वडील कुठे राहतात??

क्र. पाली शब्द मराठी अर्थ
1. मातुलानी (f) – मामा (मातुल) यांची बायको – मामी
2. पय्यिका, मातामही (f)- पणजोबा किंवा पणजोबांची बायको – पणजी
3. चुल्लमाता काका (वडिलांचे भाऊ) - ची बायको – काकू
4. पनत्ता (m) पणतू - (म्हणजे नातवाचा मुलगा)
5. सालोहितो रक्ताचे नाते – रक्तसंबंधी
6. पति, भत्ता (m) - नवरा
7. भाता (m) - भाऊ
8. देवरो - नवऱ्याचा भाऊ
9. कालो मेहुणा / दिर
10. मांतुलो - मामा (आईचा भाऊ)
11. दारको - मूल
12. माता, अम्मा - आई
13. पितुच्छापुत्तो - वडिलांच्या बहिणीचा मुलगा – चुलत भाऊ
14. सस्सु (f)- सासू
15. मातुच्छापुत्तो आईच्या भावाचा मुलगा – मामे भाऊ
16. मातुच्छा आईची बहीण – मावशी



त्रिसूत्रीच्या गूंजांनी उजळले रेडगाव — वर्षावास उत्सवात भव्य बौद्ध कार्यक्रम 🔷

रेडगाव खुर्द, चांदवड (नाशिक):
प्रज्ञा, शील आणि करुणा या बौद्ध त्रिसूत्रीने न्हालेल्या वातावरणात रेडगाव खुर्द येथील विश्वशांती दूत बुद्ध विहार येथे एक भव्य कार्यक्रम संपन्न झाला. भारतीय बौद्ध महासभा, चांदवड तालुका शाखा – संस्कार विभाग यांच्या वतीने आयोजित वर्षावास उत्सवाच्या विशेष कार्यक्रमास दिनांक २८ जुलै २०२५ (रविवार) रोजी मोठ्या संख्येने उपासक व उपासिका सहभागी झाले होते.

🌼 कार्यक्रमाची सुरुवात:
भगवान गौतम बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर उपस्थित सर्व उपासक-उपासिकांनी त्रिसरण व पंचशील यांचे सामूहिक पठण केले.

🎙 प्रमुख मार्गदर्शक – डॉ. चारुदत्त आहिरे:
डॉ. आहिरे यांनी "अष्टांगिक मार्ग", शील, करुणा आणि प्रज्ञा या बौद्ध तत्वांवर सखोल विचार मांडले. व्यसनमुक्त जीवनासाठी त्यांनी नैतिकता (शील), कृतीशील दया (करुणा) आणि जीवनाचे सत्य समजून घेणारी प्रज्ञा यांचा अभ्यास करण्याचे आवाहन केले.
"शील हे मूळ आहे, करुणा हे हृदय आणि प्रज्ञा हे उजळलेले नेत्र आहे. या त्रिसूत्रीचा विकास म्हणजे बुद्धत्वाकडे वाटचाल आहे." — डॉ. चारुदत्त आहिरे

🎤 सूत्रसंचालन:
आयु. सागर निरभवणे यांनी प्रभावी सूत्रसंचालन करत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

👥 मान्यवरांची उपस्थिती:
आ. वृषालीताई प्रभाकर वानखेडे – महिला तालुकाध्यक्ष
आ. उत्तम रघुनाथ वानखेडे – तालुकाध्यक्ष
आ. प्रकाश निवृत्ती वानखेडे – सरचिटणीस

🧍♂ उपस्थित उपासक व कार्यकर्ते:
आ. ज्ञानेश्वर उबाळे, आ. बापू आहिरे, आ. अरुण आहिरे, आ. सुर्यकांत गरुड गुरुजी, आ. किरण गरुड, आ. सतीश गरुड, आ. सागर निरभवणे, आ. प्रभाकर वानखेडे, आ. कैलास आहिरे, आ. अमित गायकवाड, आ. अथर्व गरुड, आ. प्रवीण गरुड, आ. कुणाल गरुड, आ. विश्वजीत गरुड इत्यादी कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

👩 महिला उपासिकांची सक्रिय उपस्थिती:
सानिका गरुड, जागृती गरुड, मेघा गरुड, मीना गरुड, चंद्रभागा गरुड, मीना निरभवणे, शोभा गायकवाड, निकिता निरभवणे यांच्यासह अनेक उपासिकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

🕊 कार्यक्रमाची सांगता:
कार्यक्रमाचा समारोप "सरणतय गाथा" पठणाच्या पवित्र आणि शांततेच्या वातावरणात झाला.

🙏 आभारप्रदर्शन:
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आ. सतीश गरुड यांनी उपस्थितांचे आभार मानले.



📰 भारतीय बौद्ध समाजाची प्रेरणादायी सभा कात्रप बुद्ध विहारात संपन्न

कात्रप, ठाणे — कात्रप बुद्ध विहार येथे एक प्रेरणादायी प्रवचन मालिका नुकतीच उत्साहात संपन्न झाली. या कार्यक्रमात बुद्धाचे पर्यटन स्थळे या विषयावर सखोल आणि माहितीपूर्ण प्रवचन देण्यात आले. या ज्ञानवर्धक प्रवचनासाठी आदरणीय केंद्रिय शिक्षक सुरवाडे गुरुजी प्रमुख प्रवचनकार म्हणून उपस्थित होते.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनील सिरसागर हे होते. सुरवाडे गुरुजींनी बुद्धाच्या जीवनाशी संबंधित महत्त्वाच्या स्थळांबाबत सविस्तर माहिती देऊन उपस्थितांना बौद्ध इतिहासाची व प्रेरणेची नव्याने जाणीव करून दिली.
कार्यक्रमाचे आयोजन नामदेव लाठे यांनी केले होते. संपूर्ण कार्यक्रमाचे सुरेख संयोजन पवार गुरुजी यांनी केले. उपस्थितांचे मन:पूर्वक आभार क्षीरसागर गुरुजी यांनी मानले.
कार्यक्रमाचे प्रमुख आयोजकपद सपकाळे गुरुजी यांनी स्वीकारले असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळे हा कार्यक्रम अत्यंत यशस्वीपणे पार पडला.
संपूर्ण बौद्ध समाजासाठी हा कार्यक्रम एक वैचारिक पर्वणी ठरली असून, उपस्थित सर्व भक्तगणांनी याचा मन:पूर्वक लाभ घेतला.
— त्रिपिटक वार्ता प्रतिनिधी

## वाचकाची प्रतिक्रिया
## शैलेंद्र आबाजी जवंजाळे, कळंबा, कोल्हापूर

🙏 जयभीम नमो बुद्धाय 🙏
मी गेली चार वर्षे पाली भाषेचा अभ्यास करत आहे. पाली शिकण्याच्या या प्रवासात सतीश पवार सर, प्रफुल्ल गडपाल सर यांचे मार्गदर्शन लाभले आणि बाबासाहेबांनी लिहिलेली पाली व्याकरण, शब्दार्थ कोश, तसेच बाबा भारती यांची मराठी–पाली डिक्शनरी यांचा मोठा उपयोग झाला.
या अभ्यासाचा उपयोग करून मी भारतीय बौद्ध समाज, कोल्हापूर जिल्हा (आयु. पांडे सर यांच्या मार्गदर्शनाखालील संस्था) यांच्या सहकार्याने तीन बौद्ध विहारांमध्ये पालीभाषा शिकवण्याचे वर्ग सुरु केले आहेत. मी जिथे राहतो – कळंबा, कोल्हापूर – येथे माझ्या वर्गातील काही विद्यार्थी आता धम्मपदातील गाथा समजून घेऊ लागले आहेत.
आम्ही यासोबत धम्मलिपी व शिलालेखांचे वाचन याचा देखील सराव करत आहोत.
मी बी.ए. पर्यंत शिक्षण घेतले असून सध्या एका खासगी वाहनावर चालक म्हणून काम करतो. पण बाबासाहेबांचे सचिव नानकचंद रट्टू यांच्या बाबतीत अतुल भोसेकर सरांच्या पुस्तकात वाचलेल्या एका घटनेने माझ्या आयुष्याला दिशा दिली — बाबासाहेबांनी आपल्या अखेरच्या काळात पाली भाषा शिकण्यासाठी ग्रंथ लिहिला, ही गोष्ट माझ्या मनाला भिडली आणि ठरवलं – कितीही अडचणी आल्या तरी पाली भाषा शिकायचीच!
माझ्या वर्गात मी प्रथम मराठी व्याकरण समजावून सांगतो — विभक्ती, समास, शब्दप्रकार, क्रियापदे, विशेषणे इ. — आणि मग त्याचे पालीत रूप शिकवतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना समजायला सोपे जाते आणि माझी स्वत:ची उजळणीही चांगली होते. काही अडचणी आल्यास मी पवार सर, गडपाल सर, कीर्तिराज लोणारे सर यांच्याशी संपर्क साधतो आणि त्यांचे उत्तम मार्गदर्शन मला मिळते.
माझे एकच आवाहन आहे — प्रत्येक बौद्ध व्यक्तीने किमान पालीभाषेची ओळख करून घ्यावी, म्हणजे आपल्याला आपल्या धम्माचा अभ्यास दुसऱ्याच्या आधारावर न करता स्वयंपूर्णपणे करता येईल.
"त्रिपिटकवार्ता" साप्ताहिक सुरू करून माझ्यासारख्या विद्यार्थ्यांना आपले मनोगत मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी सतीश पवार सरांचे मन:पूर्वक आभार मानतो.
🙏 साधुवाद! 🙏
जयभीम!



## श्रावस्ती बुद्ध विहार, कराड येथे वर्षावास निमित्त धम्मचर्चा संपन्न
## बनवडी कॉलनी, ता. कराड, जि. सातारा | २७ जुलै २०२५

वर्षावासाच्या पवित्र निमित्ताने श्रावस्ती बुद्ध विहार, बनवडी कॉलनी, कराड येथे "बौद्ध धम्माची मुलभूत तत्त्वे" या विषयावर रविवार दिनांक २७ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ७.३० वाजता एक प्रेरणादायी धम्मचर्चा आयोजित करण्यात आली. या धम्मचर्चेत आयु. प्रसाद गायकवाड सर (पाळी भाषा आणि धम्माचे अभ्यासक, सातारा) व आयु. भंडारे सर (सातारा) यांनी मुख्य मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून बौद्ध धम्मातील मूलतत्त्वांचे सुसंगत आणि अभ्यासपूर्ण विवेचन केले. कार्यक्रमाची सुरुवात आयु. मारुती गच्चे यांच्या प्रास्ताविक आणि वंदनाने झाली. सूत्रसंचालन आयु. किशोर जाधव यांनी सुयोग्यरीत्या केले, तर आभारप्रदर्शन आयु. प्रा. राजेंद्र सर यांनी केले.
या चर्चासत्रात आयु. राजाराम पाटणकर, तसेच अनेक धम्म उपासक, उपासिका, बालक व बालिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

## लहान मुलांचे सदर ! चला रंग भरू या!



पान क्र- 3 वरील -------------------------
एकंदरीत राष्ट्राचा कारभार आदर्श कसा करावा याचे मार्गदर्शन करणारा हा ग्रंथ आहे. नागरिकांची कर्तव्ये व मूलभुत अधिकार ही प्रकरणे म्हणजेच आदर्श जीवन पद्धती आहे. संविधान आपणास संपुर्ण संसदेची कार्यप्रणाली स्पष्ट करते. राज्य व लोकसेवा आयोगाच्या सेवा, निवडणुका, वित्तव्यवस्था इ.विषयीचे मार्गदर्शन आपणास संविधानाने होते. असा हा आदर्श जीवनप्रणालीचा मार्गदर्शक ग्रंथ शालेय जीवनापासुन सर्व नागरिकांस माहिती व्हावा त्यासाठी शालेय व महाविद्यालयीन पाठ्यक्रमात हा विषय प्राधान्यक्रमाने शिकविला जावा. घटनेचा सरनामा, घटनेतील मूलभुत हक्क व मार्गदर्शक तत्व, घटनेने निर्माण केलेली संयुक्त राजवट, न्यायालयीन स्वातंत्र्य, संसदीय लोकशाही, कायदेकानुन घटनेशी विसंगत असल्यास ते रद्द करण्याचा उच्च व सर्वोच्च न्यायालयाचा अधिकार या बाबी घटनेच्या पायाभुत तरतुदी आहेत व या घटनादुरुस्ती करुन बदलता येत नाहीत.म्हणजेच घटनेचा गाभा बदलता येत नाही. म्हणुन हे संविधान सर्व नागरिकांस माहिती असणेसाठी त्याचा समावेश अभ्यासक्रमात करणे अत्यावश्यक आहे.

हे साप्ताहिक मालक, संपादक व प्रकाशक – अनिल आनंद सुरडकर | यांनी मुद्रक – जितेंद्र महादेव रसकर | मुद्रण – श्री समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, पुणे – ४११००२ येथे छापून | प्रकाशन पत्ता – हाउस नं. २, बिल्डिंग नं. ५, सर्वे नं. ०८, सातववाडी, हडपसर, पुणे – ४११०२८ येथून प्रकाशित केले |
RNI.NO – MHMUL/25/A1620 | MO.NO : +91 8805118839 / सर्व कायदेशीर बाबी पुणे न्याय क्षेत्रात येतील | "या अंकात प्रसिद्ध झालेले बातम्या व लेख या मधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही."